पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी ४११०१८

**इ प्रभाग समिती**

कार्यपत्रिका क्रमांक-१

सभावृत्तांत

दि.- २८/०४/२०१४ वेळ- दुपारी ३:३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.इ प्रभाग समितीची सभा सोमवार दिनांक २८/०४/२०१४ रोजी दुपारी ३.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. श्री.कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१ मा.आल्हाट मंदा उत्तम
२ मा.वाबळे संजय मल्हारराव
३ मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
४ मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५ मा.मोहिनीताई विलास लांडे
६ मा.अजित दामोदर गव्हाणे
७ मा.गोफणे अनुराधा देविदास
८ मा.गव्हाणे सुरेखा शंकर
९ मा.महेशदादा किसन लांडगे
१० मा.लोंढे शुभांगी संतोष

याशिवाय मा.आशादेवी दुरगूडे- क्षेत्रीय अधिकारी, इ क्षेत्रीय कार्यालय श्री.श्रीनिवास दांगट -प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

**मुख्य कार्यकारी अधिकारी (पिठासीन अधिकारी)** - सन्मा.सदस्य, मा.आयुक्त, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे मा. इ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**मा.प्रशासन अधिकारी तथा-सचिव(सभाशाखा )** मा. इ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण २ नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | गव्हाणे सुरेखा शंकर | आल्हाट मंदा उत्तम | गोफणे अनुराधा देवीदास |
| २. | गव्हाणे सुरेखा शंकर | विनया प्रदिप (आबा) तापकीर | विश्वनाथ विठोबा लांडे |

(मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त २ नामनिर्देशनपत्र मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्राची छाननी केली.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी** – मा. इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या
**(पिठासीन अधिकारी)** एकूण **२** नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यात आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे.
त्यामध्ये मा. इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.गव्हाणे सुरेखा शंकर** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक-१ विषय क्रमांक- १
दिनांक- २८/४/२०१४ विभाग- प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या **१ (एक)** नामनिर्देशन पत्रामधील मा. इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा. गव्हाणे सुरेखा शंकर** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा. गव्हाणे सुरेखा शंकर** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करणेत येत आहे.

----

यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(कांतीलाल उमाप )**
**पिठासीन अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**

( नवनिर्वाचित सभापती **मा. गव्हाणे सुरेखा शंकर** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

त्यानंतर नवनिर्वाचित **सभापती मा. गव्हाणे सुरेखा शंकर** यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषय खालीलप्रमाणे मंजूर करणेत आले.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक- **२** | विषय क्रमांक- २ |
| दिनांक- २८/४/२०१४ | विभाग- प्रशासन |
| सुचक- मा.अजीत गव्हाणे | अनुमोदक-मा.चंद्रकांत वाळके |

इ प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

इ प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे पहील्या **बुधवारी दु. २.०० वा.** (पहील्या **बुधवारी** सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेलतर दुस-या दिवशी) इ क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा. गव्हाणे सुरेखा शंकर** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**(गव्हाणे सुरेखा शंकर )**
सभापती
इ प्रभाग समिती, भोसरी ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/१८२/२०१४
दिनांक- २८/०४/२०१४

**सही/-**
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
इ प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.